आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

१८  मार्च २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या.</u>**

- निवडणूक रोख्यांचे सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे स्टेट बँकेला निर्देश

- दिल्ली जल बोर्डाशी निगडित कथित घोटाळा प्रकरणी ईडीनं बजावलेल्या समन्सला दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल गैरहजर
- व्लादिमीर पुतीन पाचव्यांदा रशियाच्या अध्यक्षपदी

  **आणि**

- महिलांच्या प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूला अंतिम विजेतपद, युपी वॉरियर्सची दीप्ती शर्मा मालिकावीर

**<><><><><>**

निवडणूक रोख्यांच्यासंदर्भातले सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज स्टेट बँकेला दिले. रोखे खरेदी करणारा आणि हे रोखे वठवणारा राजकीय पक्ष यांची माहिती उघड होईल असा रोख्यांचा क्रमांकही जाहीर करण्याचे आदेश न्यायालयानं दिले. या रोख्यांचे सर्व तपशील स्टेट बँकेला जाहीर करावे लागतील यात कुठलंही दुमत नसल्याचं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं आज स्पष्ट केलं.

**<><><><><>**

देशातल्या स्टार्ट अप्सना विविध प्रकारचे गुंतवणूकदार आणि संभाव्य कॉर्पोरेट भागीदार यांच्याशी जोडणाऱ्या तीन दिवसीय स्टार्ट अप महाकुंभला आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथे सुरुवात झाली. जेव्हा २०१६ साली देशात हा उपक्रम

सुरु झाला तेव्हा स्टार्ट अप्सची संख्या ३०० होती आणि आता ती एक लाखावर जाऊन पोहोचली आहे, असं डी पी आय आय टी सचिव राजेश कुमार सिंह यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं.

येत्या काही महिन्यांमध्ये स्वतंत्र समर्पित डीप टेक धोरण निश्चित केलं जाईल, असं ते म्हणाले. तसंच सर्व हितसंबंधियांची आकडेवारी असणारी भारत स्टार्ट अप इकोसिस्टिम रजिस्ट्री तयार केल्याचं  त्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमात एआय, बीटूबी, एग्रीटेक, डीपटेक, क्लायमेट टेक, गेमिंग, ई-स्पोर्ट्स , फिनटेक अशी  अनेक विशेष दालनं आहेत. १० देशांमधले २ हजार स्टार्ट अप्स, ३० हजार भावी उद्योजक, आणि सुमारे पाचशे इन्क्युबेटर्स आणि शिष्टमंडळं या कार्यक्रमात सहभागी झाली आहेत.

**<><><><><>**

दक्षिणेकडील राज्यांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीची लोकप्रियता  वाढते आहे. तेलंगणाच्या जनतेच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, राज्याच्या  जलद विकासासाठी पक्ष वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी तेलंगणातल्या जगतियाली इथं आज एका निवडणूक सभेला संबोधित करताना केलं.

**<><><><><>**

महायुतीच्या बैठका आज आणि उद्या होणार असून लवकरच सर्व जागा जाहीर होतील, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात दिली. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

मुंबईतली भारत जोडो न्याय यात्रेची सभा केवळ आपापले परिवार सांभाळण्यासाठीची सभा होती. या सभेतल्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या व्यक्तव्यात गांभीर्य नव्हतं अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

दिल्ली जल बोर्डाशी निगडित कथित घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं समन्स  बजावून त्यांना आज चौकशीसाठी हजर राहायला सांगितलं होतं. मात्र हे समन्स बेकायदेशीर असल्यानं केजरीवाल आज चौकशीसाठी उपस्थित राहिले नाहीत, असं आम आदमी पार्टीनं स्पष्ट केलं आहे.

केजरीवाल यांच्याविरोधातलं हे दुसरं प्रकरण आहे. यापूर्वी त्यांना मद्यधोरण घोटाळा प्रकरणाच्या चौकशीसाठी आठ वेळा समन्स बजावण्यात आली होती. मात्र ती बेकायदेशीर असल्याचं सांगत ते चौकशीसाठी उपस्थित राहिले नव्हते. या प्रकरणी त्यांना येत्या २१ तारखेला चौकशीसाठी नववं समन्स ईडीनं जारी केलं आहे.

**<><><><><>**

आर्थिक घोटाळा प्रकारणात आरोपी असणारे दिल्लीचे माजी मंत्री सत्येंद्र जैन यांचा जामीन अर्ज आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला असून त्यांना त्वरित  शरण येण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांना आठवड्याभराचा कालावधी देण्यात यावा, अशी त्यांच्या वकिलांनी केलेली मागणीही न्यायालयानं फेटाळून लावली. अंकुश आणि वैभव जैन या दोन आरोपींचा जामीन अर्जही न्यायालयानं फेटाळला.

**<><><><><>**

बिहारमध्ये खगरिया जिल्ह्यात झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला आणि तिघे गंभीर जखमी झाले. सिमेंट भरलेल्या ट्रकला एका वाहनानं धडक दिल्यानं हा अपघात झाला. त्यानंतर हे वाहन खड्ड्यात पड़ले आणि एकाच कुटुंबातल्या सर्वांचं निधन झालं. एका विवाह समारंभातून ते येत होते. जखमींवर भागलपूर आणि आसपासच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर वाठार फाट्याजवळ कोल्हापूरहून भरधाव वेगानं जाणाऱ्या मालवाहतूक ट्रकनं रस्त्याच्या कडेला थांबलेल्या टेम्पोला काल रात्री धडक दिली. या अपघातात एका ठेकेदारासह चारजण जागीच ठार झाले, तर आठ मजूर गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये एका पादचाऱ्याचाही समावेश आहे.

**<><><><><>**

अरबी समुद्रात ४० तास कारवाई करून ताब्यात घेतलेल्या ३५ सोमाली समुद्री चाच्यांना आय एन एस कोलकाता या जहाजावरून भारतात आणलं जात आहे. भारतीय नौदलाच्या आय एन एस कोलकाता या जहाजानं अपहरण झालेल्या एम व्ही रुएन या व्यापारी जहाजाची त्याच्यावरच्या १७ खलाशांसह शनिवारी सुटका केली. या जहाजावर सुमारे १० लाख डॉलर किमतीचा माल होता. या जहाजाची प्रवासक्षमता उत्तम असल्याचं आढळून आल्यानंतर हे जहाज आणि १७ खलाशांनाही भारतात आणलं जात आहे.

**<><><><><>**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन विक्रमी ५ व्यांदा अध्यक्षपदी निवडून आले आहेत. १९९९ ते २००८ आणि २०१२ पासून आतापर्यंत पुतीन अध्यक्षपदी आहेत. २००८ ते २०१२ या कालावधीत प्रधानमंत्रीपदी ते विराजमान झाले होते. यापूर्वी सलग सर्वाधिक काळ सत्तास्थानी राहण्याचा विक्रम जोसेफ स्टॅलिन यांच्यावर होता. ते १९४१ ते १९५३ या कालावधीत प्रधानमंत्रीपदी विराजमान झाले होते. लोकांचा विश्वास आणि आशा यामुळं हा विधीलिखित विजय मिळाल्याचं पुतीन म्हणाले. रशियाच्या लष्कराला मजबूत करणं आणि युक्रेन युद्धाचा निकाल लावण्याला प्राधान्य देणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

८० टक्के राज्यांमधल्या झालेल्या मतमोजणीमध्ये पुतीन यांना ८७ टक्क्यांहून अधिक मतं मिळाली आहेत. इतर उमेदवार ५ टक्के मतंही मिळवू शकली नसल्याचं निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं. कम्युनिस्ट उमेदवार निकोलाय खारितोनोव्ह दुसऱ्या आणि व्लादिस्लाव दावनकोव्ह तिसऱ्या स्थानी आहेत.

**<><><><><>**

वेल्सच्या प्रमुख पदी पहिल्यांदाच कृष्णवर्णीय व्यक्तीची निवड झाली आहे. यासाठी झालेल्या निवडणुकीत वॉगन गेथिंग यांनी जेरेमी माइल्स यांना पराभूत केलं. यामुळं ब्रिटनमध्ये सहभागी असलेल्या चारही देशांच्या प्रमुखांपैकी एकही श्वेतवर्णीय पुरुष नाही.  ब्रिटनचे प्रधानमंत्री ऋषी सुनक भारतीय वंशांचे, स्कॉटलंडचे प्रमुख हम्जा युसुफ पाकिस्तानी वंशांचे, उत्तर आर्यलंडचं प्रमुखपद मिशेल ओ नी आणि एम्मा लिटल पेंगली यांच्याकडे संयुक्तरित्या आहे.

**<><><><><>**

युरोपियन महासंघानं इजिप्तला ८ अब्ज डॉलरची मदत जाहीर केली आहे. इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतेह अल सिसी आणि युरोपियन महासंघाचे अध्यक्ष उर्सुला वोन डेर लियेन यांच्यात काल यासंदर्भातल्या करारावर स्वाक्षरी झाली. या मदतीमध्ये अनुदान आणि कर्ज अशा दोन्ही प्रकारच्या मदतीचा समावेश आहे. इस्राइल आणि हमासमध्ये सुरू असलेल्या सुरू असलेल्या युद्धामुळं लाखो नागरिक इजिप्तमध्ये प्रवेश करत आहेत. इजिप्तच्या म्हणण्यानुसार ९० लाख स्थलांतरित त्यांच्या देशात शिरले आहेत. यामुळं त्यांच्या अर्थव्यवस्थेवर ताण आला आहे.

<><><><><>

भारत - मालदीव उच्चस्तरीय गाभा गटाची तिसरी बैठक काल माले इथे झाली. मालदीवच्या नागरिकांना मानवतावादी सेवा म्हणून दिल्या जाणाऱ्या भारतीय हवाई वाहतूक मंच सेवेसाठी भारतीय तंत्रज्ञान कर्मचाऱ्यांची विद्यमान नेमणूक या मुद्द्यावर या बैठकीत चर्चा झाली. द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक तसंच उभय देशातले संबंध दृढ करण्याबाबतही यावेळी विचारविमर्ष झाला. मालदीवमधल्या भारतीय कर्मचाऱ्यांच्या पहिल्या गटाची जागा तांत्रिक गटानं शुक्रवारी घेतल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं. गाभा गटाची यापुढची बैठक दिल्लीत होणार आहे.

<><><><><>

क्रिकेटमध्ये महिलांच्या प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं अंतिम विजेतेपद पटकावलं. दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर काल झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सला त्यांनी ८ गड्यांनी बाद केलं. नाणेफेक जिंकून फलंदाजीला आलेला दिल्लीचा संघ १९ व्या षटकात ११३ धावात सर्वबाद झाला. दिल्लीच्या शफाली वर्मानं सर्वाधिक ४४ धावा केल्या. आरसीबीच्या श्रेयंका पाटीलनं ४ गडी टिपले.

दिल्ली कॅपिटल्सनं दिलेलं ११४ धावांचं लक्ष्य बेंगळुरूनं ३ चेंडू शिल्लक असताना २ गड्यांच्या मोबदल्यात साध्य केलं. आरसीबीसाठी एल्सी पेरीनं सर्वाधिक ३५ धावा केल्या.

आरसीबीची २० धावात ३ गडी टिपणारी सोफी मोलीनेक्स सामनावीर ठरली. २९५ धावा आणि १० बळी टिपणारी युपी वॉरियर्सची दीप्ती शर्मा मालिकावीर ठरली.